# नियमित दिवाणी दावा क्र.११६६/२०२० मधील
# नि. ४३ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

(२अ) वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून वादीचा अलग व पृथक कब्जा मिळणेबाबत वगैरेकरीता दाखल केलेला आहे. सदरील अर्जात वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी नं. २ नारायण भगवानराव यादव-आवळे यांनी त्यांचे नांवे एकत्रातील शेतजमीन मोही, ता.खानापूर येथील गट नं. ३७२ मध्ये क्षेत्र हे. ७-८६ आर असे असताना त्यांनी फक्त नावावर असलेचा गैरफायदा घेवून बेकायदेशीर दावा मिळकतीमधील क्षेत्र खरेदीपत्रान्वये श्री.दत्तात्रय लकुळा खाडे यांना खुषखरेदी दस्त क्र. १९३/२०२२ ने दि. १७/०१/२२ रोजी विक्री केलेली आहे. सबब वादी हे दि. १७/०१/२२ चे खुषखरेदीपत्राचे अनुषंगाने दावेत दावा सरनामेमध्ये प्रतिवादी नं. ६ नंतर प्रतिवादी नं. ७ म्हणून श्री.दत्तात्रय लकुळा खाडे, व.व.६५, धंदा-शेती, रा.खानापूर, ता.खानापूर, जि.सांगली यांना दाव्यात प्रतिवादी क्र. ७ म्हणून सामील करणेची व दुरुस्ती होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

(२ब) तसेच कलम ५ नंतर ५अ असे नवीन कलम लिहून त्यामध्ये "५अ" प्रस्तुत वादी यांनी प्रतिवादी नं. ७ असे जाहीर होवून मिळावे.

(२क) तसेच कलम ३ मध्ये पोटकलम ३ब मध्ये शेवटची ओळ "असे जाहीर होवून मिळावे" या मजकुरापुढे "तसेच प्रतिवादी नं. २ ने बेकायदेशीर व पोकळ व तथाकथीत खरेदीपत्राच्या आधारे दि.१७/०१/२०२२ रोजी केलेला तथाकथीत खरेदीपत्राचा दस्त हा वादीचे हक्कावर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळावे." असा जादाचा मजकूर लिहिण्यास परवानगी

मागितलेली आहे. अशा प्रकारची दुरुस्ती होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

(३) प्र.वादीतर्फे म्हणणे सादर करणेत आलेले नाही.

(४) नि.४३ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व वादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, दावा दाखल केल्यानंतर वाद मिळकतीचा काही भाग दत्तात्रय लकुळा खाडे यांना विक्री केला आहे. त्यामुळे सदर खरेदीदार हा प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार आहे. यांत सदरील वादीने (२अ) नुसार मागितलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असलेची दिसून येते. तसेच सदरची दुरुस्ती केलेस दाव्याच्या मुळ ढाच्यात काहीही बदल होत नाही. सबब वादीने मागितलेली (२अ) वरील दुरुस्ती ही मंजूर झालेस दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यास मदतच होणार आहे. परंतु वादीने (२ब) नुसार मागितलेली दुरुस्ती ही अत्यंत क्लीष्ठ व समजुन न येण्यापलिकडची असल्याने तसेच (२क) ची मागितलेली विनंती ही दावा पोटकलम ३ब मधील शेवटच्या ओळीनंतर मागितलेली आहे परंतु दाव्यामध्ये पोटकलम ३ब हे नसल्यामुळे सदरची दुरुस्ती ही अत्यंत गुंतागुंतीची आहे. सबब सदर अर्ज अंशतः मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी ४३ वरील अर्ज तालुका विधी सेवा समितीला र.रु. १००/- कॉस्ट देणेचे अटीवर अंशतःमंजूर करण्यात येतो.

२. वादीची (२अ) वरील विनंती मंजूर करण्यात येते.

३. वादीची (२ब) व (२क) वरील विनंती नामंजूर करण्यात येते.

४ वादीला असे आदेशित करणेत येते की, निशाणी ४३ प्रमाणे मागणी केलेली दुरुस्ती मुळ दाव्यामध्ये आदेश दिनांकापासून १४ दिवसांचे आत करावी.

५. दावा दुरुस्तीनंतर मुळ दाव्याची प्रत न्यायालयाकरिता व एक प्रत प्रतिवादींना देणेकरिता दाखल करावी.

Sd/-
(श्रीमती अ. ब. सोनटक्के)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, जि.सांगली.

विटा.
दि.०२.१२.२०२३.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | D.S.Kadam, Jr.Clerk |
| Name of the Court | :- | Smt. A.B.Sontakke,<br>2nd Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 02.12.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 02.12.2023 |
| Order uploaded on | :- | 02.12.2023 |